!! श्री !!

शिवसेना

# खासदार चंद्रकांत खैरे

शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ४३१ २८-१-२०१६

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

## परिक्षेच्या तोंडावर बीलासाठी जि. प. शाळेंची वीज खंडीत करु नका : खासदार चंद्रकांत खैरे यांचे जिल्हा विद्युतीकरण समितीच्या बैठकित आदेश

**संभाजीनगर ( ता. २७ ) :** फेब्रुवारी-मार्च विद्यार्थ्याच्या परिक्षेच्या काळात जि.प. च्या कुठल्याही शाळेचे वीज कनेक्शन तोडू नका असा आदेश शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी आज जिल्हा विद्युतीकरण समितीच्या बैठकित दिले. तसेच वीजबिलासाठी शासनाकडून निधी न मिळाल्याने सर्व शिक्षा अभियाअंतर्गत जिल्हा परिषदेच्या शाळेंच्या वीज बिलासाठीच्या निधीची मागणी लोकसभेत करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. वीज बील भरण्यासाठी सुरु असलेल्या योजनांचा लाभ घेवून वीज ग्राहकांनी थकबाकी भरण्याचे आवाहन ही त्यांनी बैठकीत केले.

शासकिय पैसा उशिरा का होईना मिळेल त्यासाठी विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात ठेवू नका मार्च पर्यत जि.प. शाळांना विजबील भरण्यासाठी सवलत घ्यावी व आतापर्यंत तोडलेले कनेक्शन परत जोडण्यात यावे अशी मागणी नगरसेवक नंदकुमार घोडेले यांनी बैठकित केली त्यावर खासदार चंद्रकांत खैरे यांनी तात्काळ जि. प. शाळांचे वीज कनेक्शन न तोडण्याचे आदेश दिले. राष्ट्रीय महामार्गामध्ये येणाऱ्या वीज खांब, डिपी व प्रस्तावीत उच्चदाब वाहिण्यासाठी राष्ट्रीय रस्ते प्राधीकरण व महावितरणला संयुक्त सर्वेक्षण करण्याचे निर्देश दिले. राष्ट्रीय महामार्गाचे प्रकल्प संचालक जे यु चामरगोरे यांनी संदर्भात बैठकित महामार्गाच्या कामविषयी माहिती दिली. अध्यक्ष खासदार चंद्रकांत खैरे यांनी महामार्गाच्या कामाच्या गतीवर परिणाम होणार नाही यासाठी एमएसईबीचे व संबंधित युटीलीटीने दक्षता घेऊन सहकार्य करण्याचे निर्देश बैठकित दिले.

बैठकिला इन्फ्रा २ च्या कामांच प्रगती आढावा सादर करण्यात आला. बीव्हीजी व कोस्टो या कंपन्यांच्या कामांविषयी शेतकऱ्यांच्या अनेक तक्रारी असुन कामांची चौकशी करुन पुढील बैठकित अहवाल सादर करण्याचे आदेश खासदार चंद्रकांत खैरे यांनी दिले. हिवरा बांभरण येथील २ उपकेंद्र सुरु करण्यात आली असुन आठ अतिरिक्त उपकेंद्र सुरु करण्यात आली असुन आठ अतिरिक्त उपकेंद्राचे काम प्रगतीपथावर आहे. ५७५ रोहित्रांपैकी १९८ बसवणे झाले असुन ७० रोहित्रांचे काम प्रगतीपथावर आहे. उच्चदाब वाहिण्यांचे ८० कि. मी. लघुदाब वाहिण्याचे ३० कि. मी. काम पूर्ण झाले आहे.

नवीन उपकेंद्रासाठी २० जागेचा प्रस्तावित करायची असुन ३ प्रस्ताव पाठवले असुन उर्वरित प्रस्ताव ३० जानेवारीपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल करण्याचे आदेश मुख्य अभियंता सतिष चव्हाण यांनी दिले. जटवाडा, आडगाव जावळे, कचनेर, पाल, जायकवाडी, पाचपुरी, तारु पिंपळगाव, कानडगाव, महेबुबखेडा, मंगरुळ या ठिकाणच्या जागेची निवड निश्चित झाल्याची असल्याची माहिती बैठकित देण्यात आली.

एकात्मिक विकास योजनांच्या प्रस्ताव दाखल करण्याच्या सुचना अप्पर जिल्हाधिकारी सोरमारे यांनी बैठकित दिल्या. एमआयडीसीच्या जागेच्या संदर्भातील जागेचा विषय लवकर निकाली काढण्याचे आश्वासन सिईओ सोहम वायळ यांनी दिले. थकित रकमेच्या संदर्भातील मुद्दामनपाच्या शहर अभियंता सखाराम पानझडे यांनी मांडला तर पोल शिफ्टींगच्या कामांचा आढावा बनसोडे यांनी सादर केला. शिवसैनिक किरण गणोरे यांनी एमएसईबीचे जेई शर्मा यांच्या कामाविषयी बैठकीत तक्रार केली. त्यावर मुख्य अभियंता यांनी शर्मा यांना समज देऊ असे सांगितले. डॉ. अण्णा शिंदे यांनी कन्नड तालुक्यातील रोहित्र व मृत जनावरांच्या नुकसान भरपाई कडे लक्ष वेधले. माजी आमदार आर. एम. वाणी यांनी वैजापुर तालुक्यातल्या समस्या दुरध्वनीवरुन खासदार चंद्रकांत खैरे यांना कळविल्या. पैठण तालुक्यातील मागच्या बैठकितील मागण्या पूर्ण झाल्या असल्याचे मुख्य अभियंता सतीश चव्हाण यांनी सांगितले. जि. प. अध्यक्ष श्रीराम महाजन यांनी भराडी उपकेंद्राच्या अतिरिक्त विद्युत दाब कमी करण्याची मागणी केली. नगरसेवक ऋषिकेश खैरे यांनी समर्थनगर येथील नागरिकांच्या समस्या बैठकित मांडल्या. रघुनाथ चव्हाण यांनी सिल्लोड-सोयगाव तालुक्यातील विद्युत कनेक्शन शेतकऱ्यांच्या समस्या बैठकित उपस्थित केल्या. अमित पुजारी यांनी बैठकित ग्राहकसेवा केंद्र लवकर सुरु करण्याची मागणी केली. बैठकित मांडण्यात आलेल समस्यांकडे गांभीर्याने लक्ष देऊन त्या सोडविण्यासाठी पाऊले उचलण्याचे आदेश. शिवसेना उपनेते खासदार चंद्रकांत खैरे यांनी दिले.

यावेळी बैठकिस जिल्हा परिषद अध्यक्ष श्रीराम महाजन, मुख्य अभियंता सतीष चव्हाण, अप्पर जिल्हाधिकारी सोरमारे, एमआयडीसीचे सीईओ सोहम वायाळ, शहर अभियंता एस डी पानझडे, अधिक्षक अभियंता प्रभाकर निर्मळे, सुदाम खंडारे, बी बी खंदारे, ए पी पठाण, नगरसेवक नंदकुमार घोडेले, नगरसेवक ऋषिकेश खैरे, उपजिल्हाप्रमुख रघुनाथ चव्हाण, डॉ.अण्णा शिंदे, किरण गणोरे, किशोर अग्रवाल, दत्ता बडक, अमित पुजारी, एम बी कुलकर्णी आदिंसह समिती सदस्य व वीज ग्राहक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रसिध्दी प्रमुख

**योगेश पायघन / गणेश वाघ**

कार्यालय : "खैरे निवास", वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com ,
8484066606/9604384400/

yp4329@gmail.com
7769052525